N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** हातकणंगले

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0407 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/09/2023 03:08

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिनांक पासून):** 31/08/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 31/08/2023
   **Time From (वेळेपासून):** 16:38 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 17:51 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/09/2023 **Time (वेळ):** 02:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/09/2023 02:45 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** हातकणंगले वनविभाग प्रादेशिक,परिमंडळ वनअधिकारी कार्यालय, हातकणंगले , हातकणंगले

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रोहित चंद्रकांत मगदुम

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | जुना चंदुर रोड,लक्ष्मी व्यंकटेश नगर, डी/8, इचलकरंजी, ता हातकणंगले, हातकणंगले,हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | जुना चंदुर रोड,लक्ष्मी व्यंकटेश नगर, डी/8, इचलकरंजी, ता हातकणंगले, हातकणंगले,हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9168799711

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रकी केतान देसा | | | 1. बाचणी, ता कागल, जि कोल्हापूर, ,हातकणंगले , कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | मोहन आत्माराम देसाई | | | 1. प्लट नं14, ए वार्ड, सुलोचना पार्क, नवीन वाशी नाका, कोल्हापूर ,करवीर,हातकणंगले ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रूपये 20,000 | 20,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

20,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

**S.No.** (अ.क्र.) **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.)

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक - 31/08/2023

मी रोहित चंद्रकांत मगदुम, रा. जुना चंदुर रोड, आवाडे नगरच्या पाठीमागे, लक्ष्मी व्यंकटेश नगर, डी/8 इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर मो.नं.9168799711. समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 31/08/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथील पोलीस उपअधीक्षक श्री.सरदार नाळे यांना फोन करून त्यांना माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सागितली की, माझा जळाऊ लाकडे खरेदी विक्री करण्याचा व्यवसाय असुन मी सांगली, सांगोला,येथुन जळाऊ लाकडे खरेदी करून ती मी भाडयाने घेतलेल्या गाडयामध्ये भरून कोल्हापूर जिल्हयातील हातकणंगले तसेच इचलकरंजी येथे विक्री करीता आणत असतो. मी इचलकरंजी येथे असताना हातकणंगले वनअधिकारी कार्यालयातील वनरक्षक देसाईसाहेब हे माझेकडे आले व त्यांनी मला माझ्या वरनमुद व्यवसायाबाबत बोलणे सुरु करून भाडयाने घेतलेल्या गाडया मधील लाकडाची तपासणी न करण्यासाठी तसेच त्या वाहनातील जळाऊ लाकडांच्या वाहतुक परवान्यावर कारवाई न करण्यासाठी वनरक्षक देसाई हे त्यांचेसाठी व त्यांचे कार्यालयातील वनपाल देसा साहेब यांचेसाठी 20,000/- रूपयांची मागणी केली. तरी त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन तक्रार सांगुन मी आज दिनांक 31/08/2023 रोजी दुपारी वनरक्षक देसाई साहेब यांना भेटण्यास जाणार असल्याचे सांगितले. त्यावेळी नाळे साहेबांनी त्यांचे स्टाफ व पंचासह दिनांक 31/08/2023 रोजी हातकणंगले येथे येत असल्याचे सांगितले. त्यावेळी मी त्यांना महालक्ष्मी मंदिर हातकणंगले जवळ येण्यास सांगुन मी तेथे येत असल्याचे सांगितले.

दिनांक 31/08/2023 रोजी दुपारी 3.15 वाजता मी महालक्ष्मी मंदिराजवळ थांबलो. काहीवेळाने नाळे साहेब स्टाफ व पंचासह आले. त्यावेळी मी त्यांना भेटुन माझा वरील लेखी तक्रारी अर्ज त्यांचेकडे दिला. त्यावेळी साहेबांनी माझी दोन्ही पंच, स्टाफ सोबत ओळख करून देवुन त्यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना वरील माझी तक्रार सांगितली. त्यानंतर नाळे साहेबांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगुन त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डरची संपुर्ण माहिती आम्हांला देवुन हातकणंगले वनअधिकारी कार्यालयातील वनरक्षक देसाई व वनपाल देसा यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या त्यानंतर मी देसाई यांच्या मोबाईलवरती फोन केला त्यावेळी देसाई यांनी ते कार्यालयात असुन मला कार्यालयात येण्यास सांगितले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 यांना देसाई यांना भेटणेकरीता पाठविले त्यावेळी मी देसाई यांना भेटुन देसा साहेब कोठे आहेत याबाबत विचारले त्यावेळी देसाई बोलले की आताच तुझी वाट पाहुन ते निघुन गेलेत असे म्हणाले त्यानंतर आमच्यामध्ये लाकुड वाहतुकीच्या अनुषंगाने बोलणे झाले. त्यावेळी देसाई यांनी ठरले प्रमाणे आपली भेट कुठ झालती... हॉटेलला असे म्हणाले त्यावेळी मी हॉटलेला भेटलेलो आपण असे म्हणालो... त्यावेळी देसाई यांनी तिथण एकदा दहा हजार दिलायस... त्यानंतर कुठ दिलायस... असे म्हणाले त्यावेळी मी व्हय...मग आता किती देवु संपवुन टाका... असे म्हणालो. त्यावेळी नाही दोन महिन्याचं राहिल्यात... असे देसाई म्हणाले त्यावेळी मी अजुन वीस हजार...? असे म्हणालो. त्यावेळी देसाई वीस हजार रूपये असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना देसा साहेब कुठ गेलेत असे म्हणालो त्यावेळी त्यांनी देसाई यांनी देसा यांना त्याचे मोबाईलवर फोन लावला त्यावेळी मी त्यांचेसोबत फोनवर बोललो. त्यावेळी

आमच्यामध्ये लाकडाच्या गाडयाबाबत बोलणे झाले. त्यावेळी मी आमचे कडंण काय चुकल साहेब असे म्हणालो... त्यावेळी देसा साहेब काय चुकल... लोक आज बघीतल ना.... नव्ह... काय परिस्थिती... असे म्हणाले त्यावेळी मी व्हय.. व्हय.. असे म्हणालो. त्यावेळी देसा साहेब मग काय म्हणुन बाकी.... असे म्हणाले त्यावेळी मग काय अजुन किती वीस हजार देवु काय... असे म्हणालो. त्यावेळी देसा साहेब हा.. हा... असे म्हणाले त्यावेळी मी ठिक आहे ठिक आहे असे म्हणालो त्यावेळी देसा साहेब हा...असे म्हणाले. त्यावेळी मी वीस हजार देतो बघा... असे म्हणालो. त्यावेळी देसा साहेब हा...हा... असे म्हणाले. त्यावेळी मी दसाई साहेबांना वीस हजार मध्ये काही तरी कमी करा असे म्हणालो त्यावेळी देसाई यांनी नुसत दहा दिलय तु... असे म्हणाले त्यावेळी मी नाही साहेब जरा काय तरी... असे म्हणालो. त्यावेळी देसाई किती दयायचे सांग त्या वीस मधील दहा तर साहेबाला दयायला पाहीजे.... दहा मध्ये दोघ आम्ही घेणार... पाच पाच असे म्हणाले त्यावेळी मी तुमच्या वरच साहेब असे म्हणालो त्यावेळी देसाई रेंजर कांबळे साहेब त्यांचेकडे चार तालुके आहेत.. त्यांना थोड फार काय तरी दयायला लागते... वर असे म्हणाले. त्यावेळी मी हां म्हणालो. त्यावेळी माझे लक्षात आले की देसाई हे रेंजर कांबळे साहेब यांना देखील पैसे दयावे लागतात असे सांगुन माझ्याकडे पैसे मागत आहेत. त्यानंतर मला देसाई साहेबांनी तु घेवुन ये जा वीस हजार असे म्हणाले त्यांना मी एटीएम मधुन घेवुन येतो असे सांगुन मी व पंच असे साहेब थांबलेल्या ठिकाणी परत आल्यावर झाले घटनेबाबत आमचेकडे विचारणा केली तसेच व्हाईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉडींग ऐकुन माझेकडे देसाई आणि देसा यांनी 20,000 रूपयाची लाच मागितलेबाबत त्यांची खात्री झाली.

त्यानंतर सापळा कारवाई अनुषंगाने मी हजर केलेली रक्कम 20,000/- रूपयांच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावली तसेच आवश्यक ती सर्व सापळापुर्व कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर सदरच्या नोटा माझे शर्टच्या डावे बाजुच्या खिशात ठेवण्यात आल्या. त्यानंतर सापळा पथकातील सर्वांना सापळा कामाचे अनुषंगाने साहेबांनी सुचना दिल्या. तेवढयात मला देसाईचा फोन आल्याने मी पाच मिनीटात येतो असे सागितलेबाबतचा कॉल रेकॉर्ड केला. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून ते माझ्याकडे देवुन मी व पंच असे आम्ही थांबलेल्या ठिकाणाहुन निघुन हातकणंगले वनअधिकारी कार्यालयाकडे निघालो त्यावेळी आमच्या पाठोपाठ सापळा पथक येवुन कार्यालयाजवळच सापळा लावुन थांबले मी हातकणंगले वनअधिकारी कार्यालयात गेलो तेथे देसाई होते. त्यावेळी मी देसाई साहेब नमस्ते असे म्हणालो त्यावेळी देसाई यांनी मला ये ये आत ये असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना हे घ्या असे म्हणुन लाच रक्कम 20,000/- त्यांच्या पुढे केली त्यांनी ती उजव्या हाताने घेतली व मला किती आहेत असे विचारले त्यावेळी मी त्यांना तुम्ही सांगितले तेवढे आहेत असे म्हणालो. त्यावेळी देसाई साहेबांनी लाच रक्कम दोन्ही हाताने मोजुन डावे हाताने त्यांचे पॅन्टचे डावे बाजुच्या मागच्या खिशात ठेवली त्यावेळी मी त्यांना देसा साहेबांना फ़ोन लावा म्हणालो त्यावेळी देसाई साहेबांनी देसा साहेबांना फोन लावाला त्यावेळी मी देसा साहेबांशी बोललो की देसाई साहेबांना वीस हजार रूपये दिले आहेत काय तरी कमी करा असे म्हणालो त्यावेळी देसा साहेब वाढवायच सोडुन कमी करा म्हणता... असे म्हणाले. त्यावेळी मी रेंजर साहेबांना यातंल जाते का ?असे विचारले असता देसा साहेब यांनी हे नाही.. नाही...आपलं फक्त रेंजर साहेबांचा वेगळं असे म्हणुन रेंजर साहेबांना भेटायला पाहिजे... तुम्ही... रेंजर साहेबांना भेटायला लागतय... असे म्हणाले त्यानंतर फोन बंद झाला. माझे व देसाई यांच्यात लाकडाचे गाडयांच्या अनुषंगाने बोलणे चालु असताना मी उजवा हात डोक्यावरून फिरवुन पैसे स्विकारले नंतरचा पुर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर लगेच नाळे साहेब आणि त्यांचा स्टाफ तेथे येवुन लाच स्विकारलेल्या रक्कमेसह देसाई यांना पकडले त्यानंतर सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करून नाळे साहेब यांनी पोलीस निरीक्षक साळुंके साहेब व काही स्टाफ यांना वनपाल देसा यांना ताब्यात घेणेकरता रवाना केले.काहीवेळाने वनपाल देसा यांना ताब्यात घेवुन स्टाफ परत आला. त्यावेळी माझे समक्ष वनपाल देसा व वनरक्षक देसाई यांना त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव 01) रॉकी केतान देसा, पद - वनपाल, नेमणुक - प्रभारी परिमंडळ वनअधिकारी कार्यालय, हातकणंगले (वनविभाग प्रादेशिक), रा.बाचणी, ता.कागल, जि.कोल्हापूर, 02) मोहन आत्माराम देसाई, पद - वनरक्षक, नेमणुक - परिमंडळ वनअधिकारी कार्यालय, हातकणंगले (वनविभाग प्रादेशिक) रा. प्लॉट नं.14, ए वार्ड, सुलोचना पार्क, नवीन वाशी नाका, कोल्हापूर असे असल्याचे सांगितले. त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही ही शासकीय विश्रामगृह, हातकणंगले येथे पुर्ण करण्यात आली.

तरी माझा वरील व्यवसाय असुन मी लाकुड ज्या वाहनामधुन आणतो त्यातील लाकडाची तपासणी न करण्यासाठी तसेच त्या वाहनातील जळाऊ लाकडांच्या वाहतुक परवान्यावर कारवाई न करण्यासाठी मोहन आत्माराम देसाई, पद-वनरक्षक यांनी त्यांचेसाठी व रॉकी केतान देसा. पद - वनपाल यांचेकरीता 20,000/-रूपये लाचेची मागणी केली. तसेच रॉकी केतान देसा यांनी सदर लाच रक्कम मोहन देसाई यांचेकडे देणेस सहमती देवुन लाच रक्कम घेण्याकरता वनरक्षक देसाई यांना प्रोत्साहन दिले. त्याप्रमाणे वनरक्षक देसाई यांनी त्यांचेसाठी व वनपाल देसा यांचेसाठी माझेकडे मागणी केलेली 20,000/- रूपये लाच रक्कम वनरक्षक देसाइ यांनी स्विकारताना

अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडील पथकाने त्यांना रंगेहाथ पकडल्याने माझी 01) रॉकी केतन देसा, पद - वनपाल, नेमणुक - प्रभारी परिमंडळ वनअधिकारी कार्यालय, हातकणंगले (वनविभाग प्रादेशिक) 02) मोहन आत्माराम देसाई, पद - वनरक्षक, नेमणुक - वनअधिकारी कार्यालय, हातकणंगले (वनविभाग प्रादेशिक) यांचेविरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगीतलेप्रमाणे संगणकावर टंकलिखत केलेली असुन ती मी वाचुन पाहिली असता खरी व बरोबर आहे.

समक्ष हा लिहुन दिला जबाब स.ता.म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

ravindra dinkar bhosale(Dy. SP (Deputy Superintendant of Police)) / dysp

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
हातकणंगले पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)